# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**4 JULY, 2018**

[Time : 11-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करू नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

गणपती हा अतिप्राचीन देव आहे. तो आदिदेव आहे. तो भारतातलं दैवत असला तरी जगत-व्यापी आहे. नेपाळ, तिबेट, म्यानमार इथंही गणेशमूर्ती असून यातल्या काही ठिकाणी गणेश मंदिरंही आहेत. पण याशिवाय गणपतीचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कुलदैवत कोणतंही असलं तरी त्यांच्या देव्हाऱ्यात गणपतीची मूर्ती, प्रतिमा किंवा तांदळामधलं त्यांच स्वरूप हे असतंच. असा हा राजापासून रंकापर्यंतच्या घरांत रोज पूजला जात असलेला देव गणपती, खऱ्या अर्थाने लोकदेव आहे.

गणपती हा गणांचा अधिपती आहे. म्हणजे तो शौर्याचं प्रतीक आहे. तसा तो विघ्नांच हरण करणाराही आहे आणि म्हणूनच रोज प्रात:काळी आपण प्रथम त्यांच स्मरण करतो. ही झाली रोजची प्रार्थना. पण गणपती हा मंगल कार्याचाही देव आहे. आपण आरंभलेलं शुभकार्य व्यवस्थित पार पडावं याकरिता त्याची प्रथम मंत्रानं षोडशोपचारे पूजा करण्यात येते अन् त्यानंतर मंत्राद्वारे प्रार्थना करण्यात येते. 'हे विधात्या, देवांच्या नायका गणपती, तू प्रसन्न होऊन माझं कार्य सिद्धीस ने, तसंच माझी सारी संकटं नाहीशी होवोत.' असा हा गणपती प्रत्येकाच्या जीवनाशी दैनंदिन व प्रासंगिक स्वरुपात एकरुप झालेला आहे व घरोघरी पूजनीय आहे.

---